**नांदेड जिल्हयातील वाळू गटांचे पर्यावरण अनुमतीसाठी मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार नेमणूक करिता ई-निविदा**

**जा.क्र.2018/महसूल/गौ.ख./टे-1/प्र.क्र.**
**जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड**
**दिनांकः- 20/01/2018**

जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड यांच्याकडुन सर्व मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) यांना कळविण्यात येते कि, नांदेड जिल्हयातील सन 2017-2018 व सन 2018-2019 या वर्षाकरिता वाळू गटांचा पर्यावरण अनूमती मिळपवण्यासाठी Form 1/1M, EIA, EMP व Ming Plan तयार करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे.

ई-निविदाबाबत सर्व अटी व शर्ती https://co.maharashtra.nextprocure.in व www.nanded.nic.in वर उपलब्ध आहे. ई-निविदा बाबत वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | 20/01/2018 | सकाळी 11.00 वाजेपासुन |
| ई-निविदा स्वीकृती | 29/01/2018 | वेळ 16.00 वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडणे | 30/01/2018 | वेळ 16.00 वा. |
| अनामत रक्कम | रु.55000/- | -- |

**स्वाक्षरित/-**
**जिल्हाधिकारी नांदेड**

**नांदेड जिल्हयातील वाळू गटांचे पर्यावरण अनुमतीसाठी मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार नेमणूक करिता ई-निविदा**

**जा.क्र.2018/महसूल/गौ.ख./टे-1/प्र.क्र.**
**जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड**
**दिनांकः- 20/01/2018**

जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांच्याकडुन सर्व मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) यांना कळविण्यात येते कि, नांदेड जिल्हयातील सन 2017-2018 व सन 2018-2019 वर्षाकरिता वाळू गटांचा पर्यावरण अनूमती मिळविण्यासाठी Form 1/1M, EIA, EMP व Ming Plan तयार करण्यासाठी ई-निविदा खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मागविण्यात येत आहे.सदरिल निविदेची कार्यवाही https://co.maharashtra.nextprocure.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | 20/01/2018 | सकाळी 11.00 वाजेपासुन |
| ई-निविदा स्वीकृती | 29/01/2018 | वेळ 16.00 वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडणे | 30/01/2018 | वेळ 16.00 वा. |
| अनामत रक्कम | रु.55000/- | -- |

**<u>अटी व शर्ती</u>**

1. ई-निविदा अर्ज शुल्क रु. 3500/- ऑनलाईन पध्दतीने भरणा करावे लागेल.
2. ई-निविदा अनामत रक्कम रु.55000/- ऑनलाईन पध्दतीने भरणा करावी लागेल.
3. पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) mining of minerals या विभागात Quality Council of India(QCI) किंवा National Accreditation Board for Education and Training याव्दारे मान्यताप्राप्त असणे आवश्यक आहे.
4. वाळू गटांच्या पर्यावरण अनूमती मिळवण्यासाठी, Form 1/1M, EIA, EMP व Mining Plan तयार करण्याचा कमीत कमी दोन वर्षाचा अनूभव असणे आवश्यक आहे.
5. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौखनि-10/0615/प्र.क्र.289/ख दि.03/01/2018 केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातारणीय बदल मंत्रालयाच्या दि.14 सप्टेंबर 2006 (CIA Notification) दि.15/01/2016 व दि. 03/03/2016 च्या तरतूदी लागु राहतील.
6. सदर निविदा नांदेड जिल्हयातील सन 2017-2018 व सन 2018-2019 वर्षाकरिता शासन नियमाप्रमाणे निश्चित केलेल्या वाळु गटांकरिता असेल वाळू/रेती सुधारित धोरण 2018 प्रमाणे वाळूगटांचे अंतर 200 मी.पेक्षा कमी अंतर असल्यास सदर वाळूगट एकच असल्याचे गृहीत धरण्यात येईल.

7. एका वाळू गटाकरिता सर्वात कमी किंमत ई निविदा मध्ये प्राप्त होईल ती निविदा अट क्र. 2, 3 व 4 च्या अधीन राहून मान्य करण्यात येईल.
8. निविदा मान्य झाल्यावर कोणतेही अग्रीम रक्कम अनुज्ञेय राहणार नाही,काम पुर्ण झाल्यानंतर देयक अदा केले जाईल.
9. पर्यावरण अनुमती प्राप्त करुन देणे Form 1/1M, EIA, EMP व Mining Plan केंद्र शासनाच्या पर्यावरण,वन वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दि.15/01/2016 च्या तरतुदीनुसार व शासन नियमाप्रमाणे रेती गट निश्चित केल्यावर 20 दिवसात पुर्ण करणे बंधनकारक राहील.
10. ज्या वाळुगटास राज्यस्तरीय/जिल्हास्तरीय पर्यावरण समितीची मान्यता मिळाल्यावर पुर्ण रक्कम अनुज्ञेय राहील.
11. वाळु लिलाव झाल्यावर संबंधित लिलावधरकाच्या नावे पर्यावरण अनुमती वर्ग करुन देणे, Mining Plan व इतर आवश्यक तांत्रिक कागदपत्रे संबंधित लिलावधरकाच्या नावे हस्तांतरण करणे आवश्यक राहील.
12. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय पर्यावरण बैठकीस Mining of minerals प्रवर्गातील in-house expert हजर राहणे आवश्यक राहील व प्रतिनिधी पाठविता येणार नाही, याबाबत कुठलाही वाहन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
13. निविदा मान्य झाल्यावर रु.100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा दोन दिवसाचा आत करावा लागेल.
14. अटी व शर्तीचे पालन न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल आवश्यकते प्रमाणे इतर दंडात्मक रक्कम देयकातुन वजा केली जाईल.
15. कुठलीही पुर्वसूचना न देता कोणत्याही वेळी करार रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी नांदेड यांना राहतील.
16. अटी व शर्ती मध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचा करण्याचा एखादी अट शिथिल करण्याचा वा अट रद्द करण्याचा किंवा नवीन अट समाविष्ठ अधिकार जिल्हाधिकारी नांदेड यांना राहतील.
17. सदर प्रकरणी काही वाद उद्भवल्यास नांदेड न्यायपालिकेच्या अधिकार क्षेत्रात सोडवण्यात येतील.
18. कोणतेही कारण न देता निविदा नाकरण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी नांदेड यांना राहतील.
19. मा.न्यायालय व मा.हरित लवाद वेळोवेळी जे आदेश देतील ते लागू राहतील.
20. ज्या निविदाधारकाची निविदा मंजूर होईल त्यांना सुरक्षा अनामत रक्कमरु.७५०००/- शेडयूल्ड बँकेचे बँक गॅरंटी वा धनाकर्ष (D.D.) च्या स्वरुपात २ दिवसाचे आत जमा करावी लागेल अनामत रक्कम अथवा सुरक्षा अनामत रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

21. दर नमुद करताना G.S.T वा इतर सर्व करावा बोजा विचारात घेऊनच सर्व करासह दर नमुद करावेत देयक अदा करताना आयकर आदी सर्व T.D.S.च्या रक्कमा नियमानुसार वजा करुनच देयक अदा केले जाईल.
22. ई-निविदेमध्ये सहभागी होण्यास इच्छुकांनी https://co.maharashtra.nextprocure.in या संकेतस्थळावर आपले रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे. ई-निविदा प्रक्रियेकरीता डिजीटल सिग्नेचर (Signing/Verification & Encryption/Decryption) असणे आवश्यक आहे. तसेच निविदेमध्ये भाग घेण्याकरीता सर्व्हीस प्रोव्हायडर पेमेंट रु.988+ GST+ applicable payment gateway charges हे Debit Card/Credit Card/Net Banking द्वारे भरणा करावी लागेल.
23. तांत्रिक लिफाफा (Technical Bid) मध्ये नमुद आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यासच व्यावसायिक लिफाफा (Financial Bid) उघडण्यात येईल.
24. निविदेमध्ये सहभागी होण्यास आवश्यक कादगपत्रे.

**अ. तांत्रिक लिफाफा (**Technical Bid)

| | |
|---|---|
| 01 | अट क्रं.3 नुसार मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार असल्याचे प्रमाणपत्र |
| 02 | PAN Card |
| 03 | GST नोंदणी प्रमाणपत्र |
| 04 | दोन वर्ष कामाचे अनुभव असल्याचे प्रमाणपत्र |
| 05 | सदर निविदेमधील अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र |
| 06 | मागील वर्षाचे आयकर भरणा केल्याचे प्रमाणपत्र (IT Returns) |

(वरील सर्व कागदपत्रे Scan करुन PDF Format मध्ये Technical Bid वर अपलोड करावे लागतील)

**ब. व्यावसायिक लिफाफा (Financial Bid)**

ऑनलाईन दिलेल्या BOQ मध्ये दर नमुद करुन ऑनलाईन सबमिट करणे आवश्यक राहील.

**स्वाक्षरित/-**

**जिल्हाधिकारी नांदेड**

**BOQ Draft**

| Sr.No. | Work Description | Amount quoted by Bidder | |
|---|---|---|---|
| | | Rupees in figure | Rupees in word |
| 1 | Lowest price quoted for Single Sand spot as per tender document conditions point no.2, 3 & 4 | | |

## <u>निविदेमधील अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र</u>

नांदेड जिल्हयातील सन 2017-2018 व सन 2018-2019 वर्षाकरिता वाळू गटांचा पर्यावरण अनूमती मिळविण्यासाठी Form 1/1M, EIA, EMP व Ming Plan तयार करण्यासाठी दि.----------- रोजी जाहीरातीव्दारे ई-निविदा मागविण्यात आली आहे.

सदरील ई-निविदेमध्ये जिल्हाधिकारी, नांदेड यांनी नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असल्याबाबतची हमी देत आहे.

ठिकाणः-
दिनांकः-

स्वाक्षरीः-
नावः-
पत्ता व मोबाईल क्रमांकः-

ईमेल आयडीः-